**महाराष्ट्र शासन**
**साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**यांचे कार्यालय**
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५

जा.क्र.सा.आ./लेखापरीक्षण/कक्ष-५/परिव्यय व उर्जा पुरवणी नामतालिका/ ९५ / सन २०२६ दि३०/०४/२०२६

**विषय :- परिव्यय व ऊर्जा लेखापरीक्षणासाठी अर्हताधारक लेखापरीक्षकांची पुरवणी नामतालिका तयार करणेबाबत...**

**संदर्भ :** १) या कार्यालयाचे दिनांक २३/०२/२०२४ रोजीच्या परिपत्रकीय सुचना.
२) या कार्यालयाचे दिनांक २८/०६/२०२४ चे आदेश.
३) या कार्यालयाचे दिनांक १७/०४/२०२५ चे आदेश
४) माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ मध्ये नव्याने प्राप्त झालेले अर्ज

साखर कारखान्यांच्या परिव्यय व उर्जा लेखापरीक्षणासाठी अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करणेबाबत कार्यपध्दती, निकष व अटी/शर्ती संदर्भ क्र.१ चे परिपत्रकात नमूद केलेल्या असून त्यानुसार साखर आयुक्तालयाने पात्र लेखापरीक्षकांची नामतालिका संदर्भ क्र. २ अन्वये प्रसिध्द केलेली आहे.

वरील संदर्भान्वये, नव्याने अर्हता धारण करणाऱ्या परिव्यय लेखापालांना व उर्जा लेखापरीक्षकांना सदर ५ वर्षाच्या कालावधीमध्ये नामतालिकेवर यावयाचे झाल्यास अशा लेखापरीक्षकांनी प्रतीवर्षी माहे जानेवारी ते मार्च या कालावधीमध्ये परिपत्रकासोबत निर्धारित करून दिलेल्या आवेदन नमुन्यामध्ये अर्ज करावयाचा आहे. पात्र अर्जदार अशा रीतीने प्रतिवर्षी माहे- एप्रिल मध्ये ज्या-त्या नामतालिकेमध्ये पुरवणी यादीद्वारे नोंदणीकृत केले जातील. तथापि, ५ वर्षासाठी विषद रीतीने तयार केलेल्या नामतालिकेचा कालावधी माहे मार्च २०२९ रोजी संपुष्टात येईल. त्यावेळी सर्वच अर्हताधारक लेखापरीक्षकांनी नव्याने अर्ज करणे अनिवार्य राहील, या प्रमाणे परिपत्रकीय सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार वरील संदर्भीय आदेश ३ नुसार सन २०२४-२५ मध्ये पुरवणी यादीमध्ये ०४ परिव्यय लेखापरीक्षक व ०० उर्जा लेखापरीक्षकांचा समावेश झालेला असल्याने दि.३१/०३/२०२५ अखेर एकूण ३७ परिव्यय लेखापरीक्षक व ०६ उर्जा लेखापरीक्षकांचा यादीत समावेश आहे.

साखर कारखान्यांच्या परिव्यय लेखापरीक्षक नामतालीकेवर नोंदणीकृत होणेसाठी उक्त सुचनांप्रमाणे माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या कालावधीत साखर आयुक्त कार्यालयाकडे ०१ परिव्यय लेखापरीक्षकांचे अर्ज प्राप्त झालेले आहे. प्राप्त झालेल्या सदर १अर्जाची छाननी केली असता ते लेखापरीक्षक नामतालीकेवर नोंदणीकृत होण्यासाठी आवश्यक असलेल्या निकषांची पूर्तता करीत असल्याने त्यांचा समावेश सन २०२६-२७ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी परिव्यय लेखापरीक्षकांच्या नामतालिकेत करणेत येत असून त्यांचे नाव सोबतच्या परिशिष्ठ ' अ ' मध्ये नमूद केलेले आहे.

तसेच उक्त सुचनांप्रमाणे माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या कालावधीत ऊर्जा लेखापरीक्षक नामतालीकेवर नोंदणीकृत होणेसाठी उर्जा लेखापरीक्षक फर्मचे २ अर्ज प्राप झालेले आहेत. प्राप्त झालेल्या सदर २ अर्जांची छाननी केली असता त्यापैकी १ लेखापरीक्षक फर्म नामतालीकेवर नोंदणीकृत होण्यासाठी आवश्यक असलेल्या निकषांची पूर्तता करीत असल्याने त्यांचा समावेश सन २०२६-२७ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी उर्जा लेखापरीक्षकांच्या नामतालिकेत करणेत येत असून त्यांचे नाव सोबतच्या परिशिष्ठ ' ब ' मध्ये नमूद केलेले आहे.

पुरवणी यादी मध्ये समाविष्ट अर्जदारांचा कालावधी समावेशापासुन पुढे दिनांक ३१/०३/२०२९ पर्यंत राहील. पुरवणी यादी प्रमाणे समाविष्ट लेखापरीक्षकांना संदर्भ क्र. १ चे परिपत्रक व संदर्भ क्र. २ चे आदेशातील सुचनां आणि अटी व शर्तीचे पालन करणे अनिवार्य राहील.

**सोबत :-** पुरवणी नामतालिका सन २०२६-२७
ते सन २०२८-२९ अनुसूचि 'अ' व "ब"

(डॉ संजय कोलते )
आयुक्त साखर,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

संबधित परिव्यय व उर्जा लेखापरीक्षक,

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर -</u>

१. मा.प्रधान सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

<u>प्रत पुढील उचित कार्यवाहीसाठी -</u>

१. प्रशासन कार्यासन, साखर आयुक्त कार्यालय, पुणे.
   यांनी सदरहू परिपत्रक व त्या सोबतची अनुसुची 'अ' व 'ब' तात्काळ या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी अपलोड करावेत.
२. अध्यक्ष / उपाध्यक्ष / सचिव, इस्टीटयुट व कॉस्ट अकाऊटंट्स ऑफ इंडिया, अंतर्गत वेस्टर्न इंडिया रिजनल काऊन्सिल.
   यांनी सदरहू परिपत्रक व त्यासोबतची नामतालिका अनुसुची इन्स्टिट्युटच्या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी अपलोड करावी.
३. महाव्यवस्थापक, एम.ई.डी.ए. (मेडा) पुणे व उर्जा लेखापरीक्षकांचे संघटन यांना प्रसिध्दीसाठी
४. प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व यांना प्रसिध्दीसाठी.
५. विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (साखर) सर्व.
६. सर्व साखर कारखाने.

दिनांक २३.०२.२०२४ रोजीचे परिपत्रक व दिनांक २८.०६.२०२४ रोजीचे आदेश यानुसार सन २०२५-२६ मध्ये प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र लेखापरीक्षक मुळ परिपत्रकातील अटी व शर्ती नुसार सन २०२६-२७ ते २०२८-२९ या कालावधीसाठी परिव्यय लेखापरीक्षकांची पुरवणी यादी.

परिव्यय लेखापरीक्षकांची पुरवणी नामतालिका सन २०२६ ते २०२९ : परिशिष्ठ "अ"

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | नोंदणी क्र. व दिनांक | कार्यालयीन पत्ता | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निलेश भास्कर केकाण ॲण्ड असोसिएटस | ००७४७६ दि. १७.०३.२०२६ | उत्तम निवास स. नं.७० गणेशपार्क मागे क्लासिक पुजा ब्लि. समोर कात्रज संतोषनगर, पुणे ४६ | ९८८१५६२१४१ | nkekan@rediffmail.com |

ऊर्जा लेखापरीक्षकांची पुरवणी नामतालिका सन २०२६ ते २०२९ : परिशिष्ठ "ब"

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | नोंदणी क्र. व दिनांक | कार्यालयीन पत्ता | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इन्कॉन एज्युकेशन ॲण्ड रिसर्च फाउ्उडेशन | EA-७२१८] AEA-०३१२ | १६/१३८५ Near Dr.Dhawle residence Ichalkaranji Dist-Kolhapur४१६११५ | ७३५०५४२०२०, ९४२२४१२६६४ | enconresearchfoundation@gmail.com |
| | | | | | |

दिनांक : 30/08/2026
ठिकाण :- पुणे.

(डॉ संजय कोलते )
आयुक्त साखर,
महाराष्ट्र राज्य, पुणे